# कार्यावली

**सोमवार, दिनांक १५ जुलै, २०१३ रोजी सकाळी ११-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१३ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली.**

**एक.** अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**दोन.** प्रश्नोत्तरे.

**तीन.** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार.** सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच.** सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

**सहा.** लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**सात.** सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ.** अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**नऊ.** अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**दहा.** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा.** पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**बारा.** रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा.** विधानसभा विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करणे.

**चौदा.** उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

**पंधरा.** विधानसभा आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

**सोळा.** **शासकीय विधेयके --**

**(अ) खालील विधेयके विधानसभेकडे विचारार्थ प्रलंबित आहेत :-**

(१) सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक, २०११.

(२) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(ब) विधानपरिषदेने संमत केलेली खालील विधेयके विधानसभेकडे विचारार्थ प्रलंबित आहेत :-**

(१) सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतातील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१०.

(२) सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(क) विधानपरिषदेने संमत केलेले खालील विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ प्रलंबित आहे :-**

सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**सतरा.** शोक प्रस्ताव.

**अठरा.** इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**एकोणीस.** **अशासकीय विधेयके --**

**विचारार्थ--**

**(१)** सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक २४ - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(२)** सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(३)** सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक २८ - महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(४)** सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(५)** सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३० - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - बाल कामगार (प्रतिबंध व विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(७) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(८) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३५ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(९) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१०) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३९ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(११) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४० - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१२) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१३) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४४ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१४) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४६ - मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१५) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१६) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४९ - महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१७) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१८) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ५२ - मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(१९) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२०) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - भारतीय दंड संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२१) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ५८ - हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२२) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ५९ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (दुसरी सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२३) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (दुसरी सुधारणा ) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२४) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - भारतीय दंड संहिता (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२५) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६२ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २००९- **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२६) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - औषधीद्रव्ये व सौंदर्य प्रसाधन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२७) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६४ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२८) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६५ - महाराष्ट्र ऊस तोडणी मजूर (नोकरीचे नियमन व कल्याण) विधेयक, २००९ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२९) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६७ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) (सुधारणा) विधेयक, २००९ - **श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचे.**

(३०) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २ - बियाणे (सुधारणा) विधेयक, २०१०- **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३२) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई सावकार (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३३) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ५ - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१०- **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३५) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३६) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३७) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ९ - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३८) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १० - विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(३९) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ११ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुभाष देसाई, वि.स.स. यांचे.**

(४०) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १३ - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र रस्त्यांवर रहाणाऱ्या मुलांना विवक्षित सोयी व सुविधा पुरविणे आणि महाराष्ट्र शासनाने त्यांची जबाबदारी स्वीकारणे विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४२) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १५ - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र तिसरी सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४३) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १७ - शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४५) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १८ - मुंबई न्यायालय फी (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४६) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १९ - महाराष्ट्र परत बोलविण्याचा अधिकार विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४७) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २० - महाराष्ट्र आवाज प्रदूषण प्रतिबंधक (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४८) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २१ - महाराष्ट्र धुम्रपानास व थुंकण्यास मनाई करण्याबाबत विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४९) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २३ - महाराष्ट्र यंत्रमाग कामगार (नोकरीचे विनियमन व कल्याण) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५०) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५२) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ३३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. प्रशांत बंब, वि.स.स. यांचे.**

(५३) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ३९- महाराष्ट्र अविघटनशील कचरा

(नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचे.**

(५४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४२ - भारतीय दंड संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५५) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४३ - मुंबई पोलिस (सुधारणा) विधेयक, २०१० **- श्री. सुभाष देसाई, वि.स.स. यांचे.**

(५६) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४४ - महाराष्ट्र पिण्याच्या पाण्याची चोरी करण्यास प्रतिबंध विधेयक, २०१० - **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचे.**

(५७) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४६ - महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५८) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र प्रोत्साहनाद्वारे कुटुंब नियोजनास चालना देण्याबाबत विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(५९) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६०) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ५१ - मुंबई दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ५६ - मुंबई प्राथमिक शिक्षण (सुधारणा) विधेयक, २०१० **- श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६२) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ५८ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री.विवेक पाटील, वि.स.स. यांचे.**

(६३) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ५९ - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री.विवेक पाटील, वि.स.स. यांचे.**

(६४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ६७ - महाराष्ट्र भाडेनियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६५) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ६८ - महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करणेबाबत विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६६) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ६९ - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६७) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ७० - महाराष्ट्र कामकरी स्त्रिया व महिला शेतमजूर (प्रसुती सहाय्य) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६८) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ७१ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६९) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ७२ - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिरात व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१०- **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(७०) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ७३ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०१०- **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(७१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ८३ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१०- **श्री. शिशिर शिंदे, वि.स.स. यांचे.**

(७२) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ८५ - भारतीय दंड संहिता (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. शिशिर शिंदे, वि.स.स. यांचे.**

(७३) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ८६ - महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी शाळा (कॅपिटेशन शुल्क घेण्यास प्रतिबंध आणि शुल्क नियमन करण्याची कार्यपध्दती) विधेयक, २०१० - **श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचे.**

(७४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ८७ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१० - **सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुभाष देसाई, बाळा नांदगांवकर, विवेक पंडीत, गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

(७५) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ३० - मुंबई दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०११ - **श्री.रुपेश म्हात्रे, वि.स.स.** यांचे.

(७६) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०११ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(७७) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था

(कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०११ - **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचे.**

(७८) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०११ - **श्री.चिमणराव पाटील, वि.स.स. यांचे.**

(७९) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - महाराष्ट्र राज्य सेवा हमी विधेयक, २०११ **सर्वश्री देवेंद्र फडणवीस, एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स. यांचे.**

(८०) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र धार्मिक व धर्मादाय संस्थांकडील इनाम वतने नाहिशी करण्याबाबत विधेयक, २०१२ - **श्री.प्रमोद जठार, वि.स.स. यांचे.**

(८१) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.मंगेश सांगळे, वि.स.स. यांचे.**

(८२) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र प्रसारमाध्यमे सेवा-व्यक्ती आणि प्रसारमाध्यमे सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी यांना प्रतिबंध) विधेयक, २०१२- **श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचे.**

(८३) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०१२ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(८४) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक २८ - महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

(८५) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

(८६) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष न्यायालये विधेयक, २०१२ - **सर्वश्री सुभाष देसाई, एकनाथ शिंदे, वि.स.स. यांचे.**

(८७) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (सुधारणा) विधेयक, २०१२ **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(८८) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र पोलीस विधेयक, २०१२ - **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचे.**

**(८९)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - भारतीय दंड संहीता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(९०)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ६ - हिंदू वारसा (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(९१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ७ - फौजदारी प्रक्रिया संहिता, (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचे.**

**(९२)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ८ - फौजदारी प्रक्रिया संहिता, (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३- **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**वीस.** **अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६) :-**

**श्री.प्रमोद जठार यांचे ठराव क्रमांक ६ व ८**

(६) "कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची होत असलेली मागणी लक्षात घेता, सध्याच्या मुंबई विद्यापीठाचे विभाजन करुन रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या तीन जिल्हयातील सुमारे १३० महाविद्यालयांकरिता एक स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८) "कोकण रेल्वे सुरु होवून सुमारे १३ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही आजमितीस या मार्गावर एकमार्गी (Single Track) वाहतूक सुरु असणे, कोकणातील जनतेने या मार्गासाठी आवश्यक असलेली आपली बहुमूल्य जमिन कोकण रेल्वेसाठी उपलब्ध करुन दिलेली असतानाही कोकणातील विशेषत: सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील जनतेसाठी मोजक्याच रेल्वे गाडया असल्याने या रेल्वेचा विशेष फायदा कोकणातील जनतेला होत नसल्याकारणाने कोकण रेल्वे एकेरी मार्गाचे विस्तारीकरण करुन दुहेरी मार्ग सुरु करण्याच्या दृष्टीने तसेच कोकणातील प्रवाशांच्या संख्येत वाढ झाल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी आरक्षण वाढविणे, या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.गोवर्धन शर्मा यांचे ठराव क्रमांक ९, १०, ११, १२ व १३**

(९) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०) ''राज्यात अनेक कुटुंबांचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्रय रेषेखालील पिवळया शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,०००/- वार्षिक उत्पन्न दारिद्रयरेषेची मर्यादा १० वर्षापुर्वी ठरविली असणे, तसेच शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्रय रेषेची मर्यादा रुपये

२५,०००/- ठरविली असणे, यामध्ये स्वत:च्या मालकीचे घर, कलर टि.व्ही., गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल केल्या असणे, एकाच शासनाचे दारिद्रय रेषेसाठी असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून मिळणारे धान्य अपुरे असल्याने दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची मर्यादा रुपये १५,००० वरुन रुपये ५०,०००/- करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची शासनाने मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(११) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलिस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलीसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तूंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तूंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तूंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे ठराव क्रमांक १४, १५, १६ व १८

(१४) "महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पिक उत्पन्न क्षमतेपेक्षा विविध देशातील शेतकऱ्यांची पिक उत्पन्न क्षमता कितीतरी पटीने जास्त असल्याने मुक्त अर्थव्यवस्थेच्या युगात राज्यातील शेतकऱ्यांच्या भविष्यकाळ अंध:कारमय होणे, राज्यातील शेतकऱ्यांना सतत आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून राज्यात मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे, त्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्याची नितांत आवश्यकता, शेतकऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी तसेच त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाठी राज्याच्या कृषी विषयक धोरणात निश्चित स्वरुपाचा बदल करण्यासाठी शासनाने ठोस व कालबध्द उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५) "राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायू प्रदूषण व जल प्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसाखाणी पासून होत असलेले प्रदुषण, उद्योजक करारनामा करुन देखील नियम पाळत नसणे, विशेषत: ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणींसाठी

परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे प्रदुषणावर आळा घालण्याकरिता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वावर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६) "विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/ पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन विदर्भात सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८) "राज्यातील सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांना दिलासा मिळावा यासाठी शासकीय व निमशासकीय सेवेत नोकर भरती करताना खुल्या प्रवर्गातील असलेली ३३ वर्षे वयाची मर्यादा ३८ वर्षे करण्यात यावी तसेच अनुसूचित जाती व जमातीकरीता असलेली ३८ वर्षे वयाची मर्यादा ४० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.सुभाष देसाई यांचे ठराव क्रमांक १९, २०, २१ व २२

(१९) "सायकलींग हे प्रवासाचे प्रदूषणमुक्त साधन असून जास्तीत जास्त नागरिकांनी सायकलींचा दररोज वापर केल्यास हवेचे व ध्वनीचे प्रदूषण करणारी मोटारींसारखी वाहने कमी वापरली जातील. त्यामुळे इंधनाची बचत होऊ शकते, तसेच सायकलींग स्पर्धेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्यातून जाणाऱ्या स्पर्धकांना व्यायाम सराव व प्रोत्साहन मिळू शकते, याकरिता राज्यातील शहरी,जिल्हा व तालुका स्तरावरील राज्यमार्ग व जिल्हामार्ग रस्त्यांचा एक सुरक्षित पट्टा केवळ सायकलींसाठी आरक्षित करण्यासाठी शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२०) "मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ या सुमारे ६०० कि.मी. लांबीच्या अंतरामध्ये असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे, असलेले असंख्य चढउतार, कालबाहय झालेले असंख्य अरुंद, कमकुवत व मोडकळीस आलेले पूल, अनेक ठिकाणी रस्त्यांच्या बाजूने संरक्षण भिंत, कठडे नसणे, साईनबोर्डस, साईडपट्टयाचा अभाव तसेच संपूर्ण महामार्गाची झालेली दुरावस्था, परिणामतः या महामार्गावर सातत्याने होत असलेले अपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली मनुष्यहानी, ट्रक, मोटारगाडया व अन्य वाहनांसह मालमत्तेचे झालेले व होत असलेले प्रचंड प्रमाणातील नुकसान, या सर्व बाबी विचारात घेता मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या महामार्गावर असलेली सर्व वेडीवाकडी वळणे, चढउतार तसेच अरुंद, कमकुवत, मोडकळीस आलेल्या व त्यामुळे कालबाहय झालेल्या पुलांच्या पुर्नबांधणी आदी कामाबाबत एक कालबध्द योजना आखून त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१) "राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायू प्रदूषण व जल प्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसाखाणी पासून होत असलेले प्रदुषण, उद्योजक करारनामा करुन देखील नियम पाळत नसणे, विशेषतः ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणींसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे प्रदुषणावर आळा घालण्याकरिता येत

असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वावर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२) "देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरीता लढा देऊन त्यासाठी काळया पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना "मरणोत्तर भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ.संजय कुटे यांचा ठराव क्रमांक ३१**

(३१) "महाराष्ट्र राज्यामध्ये "लेक वाचवा अभियान" राबविणे सुरु असणे, विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करुन याबाबत जनजागृती सुरु असणे, राज्यात अनेक दाम्पत्यांना केवळ एकच मुलगी असणे किंवा दोन मुली असणे, स्त्रीभूणहत्या रोखण्यासाठी सदर अभियान प्रभावीपणे अंमलात आणून जनजागृती करण्याची आवश्यकता असणे, त्याकरीता केवळ मुली असलेल्या दाम्पत्याला शासकीय योजनांचा थेट लाभ देण्याच्या अनुषंगाने दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.जितेंद्र आव्हाड यांचे ठराव क्रमांक ३२, ३३, ३४, ३५ व ३६**

(३२) "ठाणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याची वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे ठाणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, यासंदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३) "मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड प्रमाणात वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४) "ठाणे जिल्हा शहरी, ग्रामीण, सागरी, डोंगरी भागामध्ये वसलेला असून त्याचे क्षेत्रफळ अफाट असणे, मोठया प्रमाणात होत असलेले नागरीकरण झपाटयाने वाढत असलेली लोकसंख्या, ग्रामीण उपेक्षित भागांचा विचार करता विकासाचा समतोल राखण्यासाठी मोठया प्रमाणात प्रशासकीय ताण वाढत असल्याने ठाणे जिल्हयाचे विभाजन करुन जिल्हयाचा सर्वोतोपरी विकास करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५) "ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा व कळवा ही शहरे एका बाजूने डोंगर व दुसऱ्या बाजूने समुद्रखाडी यामध्ये वसलेली असून शहरातील नागरीकरणाचा प्रचंड वेग लक्षात घेता, मुलभूत सोयीसुविधांवर पडत असलेला प्रचंड ताण, या शहरांचा विकास नियोजनबध्द

होणेसाठी लागणारा कोटयावधी रुपयांचा निधी, हा निधी उपलब्ध करुन देण्याची स्थानिक प्रशासनाची आर्थिक क्षमता नसल्याने या परिसराला मुलभूत सुविधा मिळाव्यात व शहरांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून जादा निधी मिळण्याची नितांत आवश्यकता, विकासाच्या कामांची कालमर्यादा निश्चित करुन ही शहरे उच्च दर्जाची व्हावीत यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. "

(३६) "ठाणे महानगरपालिका क्षेत्राचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण, वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, वाहतूक पोलिसांची अपुरी संख्या यामुळे परिसरामध्ये वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होऊन गंभीर समस्या निर्माण झाली असणे, दिवसेंदिवस अपघातांचे वाढते प्रमाण, या सर्व बाबींचा विचार करता, परिसरातील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.कृषिभूषण साहेबराव पाटील यांचे ठराव क्रमांक ३७, ३८, ३९ व ४१

(३७) "खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/ पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी बि- बियाणे, रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३९) "जळगांव जिल्हयातील खानदेश कन्या कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास कवियत्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ असे नामकरण करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४१) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## डॉ.सुजीत मिनचेकर यांचे ठराव क्रमांक ४२, ४३ व ४६

(४२) "दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रयरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४३) "राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४६) "राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरिता सर्व गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्याबाबत आणि आवश्यक असेल तेथे नद्या, नाले, मोऱ्या यांचेवर पूल बांधण्यासाठी शासनाने धडक योजना अंमलात आणावी व या संदर्भातील अंमलबजावणीसाठी स्वतंत्र ग्रामीण रस्ते विकास महामंडळ स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.चंद्रदीप नरके यांचे ठराव क्रमांक ४७ व ४८**

(४७) "राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४८) "राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरिता सर्व गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्याबाबत आणि आवश्यक असेल तेथे नद्या, नाले, मोऱ्या यांचेवर पूल बांधण्यासाठी शासनाने धडक योजना अंमलात आणावी व या संदर्भातील अंमलबजावणीसाठी स्वतंत्र ग्रामीण रस्ते विकास महामंडळ स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.रविंद्र वायकर यांचे ठराव क्रमांक ५२, ५३, ५४ व १८६**

(५२) "देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नांव पुणे शहरातील लोहगांव या विमानतळास देण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५३) "मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाचे नामकरण करुन सी.डी.देशमुख यांचे नाव देण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५४) "मुंबई शहरातील वाहतूकीची होणारी प्रचंड कोंडी, वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, वाहतूक पोलिसांची अपुरी संख्या, शासनाने बांधलेले उड्डाणपूल व वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतूकीची समस्या अत्यंत गंभीर बनत चालली असून यावर तातडीने मार्ग काढण्यासाठी व मुंबईतील वाहतूक सुयोग्य करण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८६) "मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारी अप्पर-तानसा आदि धरणे ही इंग्रज काळातील असून मुंबई शहरात परप्रांतीयांच्या येणाऱ्या लोंढयामुळे मुंबईची लोकसंख्या दीड कोटीच्या आसपास असल्याने मुंबई शहर व उपनगराला पाणी पुरवठयाची निर्माण झालेली गंभीर

समस्या लक्षात घेता कोयना धरणातून वशिष्ठ नदीत सोडण्यात येणारे अतिरिक्त पाणी मुंबई शहराची वाढती पाण्याची गरज भागविण्यासाठी पुरविण्यात यावे, यासाठी शासनाने एक खास योजना तयार करुन तीची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.विजयराज शिंदे यांचा ठराव क्रमांक ५८ व ५९**

(५८) "विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/ पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन विदर्भात सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५९) "खामगांव-जालना व बुऱ्हाणपूर-सोलापूर या रेल्वेमार्गाचे ब्रिटीश काळापासून सर्वेक्षण होवून त्याचवेळी या मार्गाचे काही प्रमाणात कच्चे काम ही होणे, परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या दोन्ही महत्त्वपूर्ण रेल्वे मार्गाचे काम प्रलंबित राहणे, यामुळे या भागाचा विकास न होणे, उद्योग व्यवसाय वाढीस न येणे, अतः या भागाचा विकास होण्याच्या दृष्टीने खामगांव-जालना व बुऱ्हाणपुर-सोलापूर मार्गाच्या मान्यतेसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा व त्यासाठी लागणाऱ्या निधीतील राज्य शासनाच्या हिश्याचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.महादेव बाबर यांचे ठराव क्रमांक ६१, ६२, ६३, ६४ व ६५**

(६१) "पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या जिल्हयातील जनतेच्या सोयीसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ पुणे येथे स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६२) "राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत याकरीता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पहाणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले, मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६३) "राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६४) "राज्याच्या ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६५) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे मोठया प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरामधील कचरा

टाकतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचराडेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदुषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र "कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ" स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.आर.एम. वाणी यांचे ठराव क्रमांक ६६, ६७, ६८, ६९ व ७०

(६६) "राज्यातील इतर विभागांपेक्षा मराठवाडा तुलनात्मकदृष्टया मागासलेला असल्याने मराठवाडयाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले १) लातूर ते मिरज, २) पूर्णा ते अकोला, ३) मुदखेड ते निजामाबाद,सिकंदराबाद,४) रोटेगाव ते पुणतांबा, ५) परळी-बीड-नगर हे नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी नांदेड ते मनमाड रेल्वे मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करणे तसेच अपूर्ण असलेले रेल्वे मार्ग पूर्ण होण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६७) "राज्यातील विशेषत: मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, खाडया, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७२) "राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत याकरीता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पहाणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले, मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.राजहंस सिंह यांचे ठराव क्रमांक १७३, १७४, १७५, १७६ व १७७

(१७३) "वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत,

अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७४) "जीवनावश्यक वस्तूंचे कडालेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७५) "राज्यात, विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, तसेच विविध कारणामुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्याच्या अंमलबजावणीतील होणारी कुचराई यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७६) "राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हे शोधून काढण्यात व गुन्हेगारांना पकडण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधीमंडळातील दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे "

(१७७) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.राजेश क्षिरसागर यांचे ठराव क्रमांक १७९ व १८०

(१७९) "राज्यातील सर्व महामार्गावरील रहदारी ही मोठया प्रमाणावर वाढली असून त्याचे योग्य नियोजन न होणे, अरुंद रस्ते, वळणे यामुळे अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होत असलेली मनुष्यहानी व वित्तहानी यावर उपाय म्हणून सर्व राज्य महामार्ग व त्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरीकरण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८०) "जीवनावश्यक वस्तूंचे कडालेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.नरेंद्र भोंडेकर यांचा ठराव क्रमांक १८४

(१८४) "राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड

प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.संभाजी पवार यांचे ठराव क्रमांक १८७, १८८ व १९०

(१८७) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८८) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९०) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्रीमती मिनाक्षी पाटील यांचे ठराव क्रमांक १९२, १९३, १९४ व १९६

(१९२) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९३) "अलिबाग तालुक्यातील (जिल्हा रायगड) शेतकऱ्यांनी ७६ वर्षापूर्वी कुळकायदा व कसेल त्याची जमीन हा कायदा अंमलात आणण्यासाठी केलेल्या संपाचे नेतृत्व केलेल्या स्व. नारायण नागू पाटील यांचे चरी येथे यथोचित स्मारक व्हावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९४) "कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जिल्हा

रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/ दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिप्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९६) "कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना /पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्रीमती निर्मला गावित यांचे ठराव क्रमांक २००, २०१ व २०२

(२००) "खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/ पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२०१) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२०२) "राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांचे ठराव क्रमांक २०९, २१०, २११ व २१२

(२०९) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१०) " राज्यातील जळगाव आणि विदर्भातील काही ठिकाणी उष्णतेचा उच्चांक गाठला जाणे, अशावेळी लोकांना उष्णता सहन न झाल्याने काही वेळेस मृत्यु ओढवणे, गेल्या दोन-तीन वर्षापासून उष्माघाताने मोठ्या प्रमाणात झालेले मृत्यु विचारात घेता उष्माघाताने झालेले

मृत्यु ही बाब नैसर्गिक आपत्ती समजण्यात यावी व नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू पावलेल्यांना जे आर्थिक सहाय्य मिळते त्याच धर्तीवर उष्माघाताने मृत्यु पावलेल्यांच्या कुटुंबियांनासुध्दा आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२११) शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१२) "राज्यातील प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपांचा मोठया प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब, त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणा-या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.प्रकाश महेता यांचे ठराव क्रमांक २१३, २१४, २१६ व २१७**

(२१३) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१४) "मुंबई शहरात दिवसेंदिवस वाहनात होत असलेली वाढ तसेच रस्ते रुंदीकरणाच्या कामात होत असलेली दिरंगाई, वाहतुक पोलिसांची असलेली अपूरी संख्या, यामुळे वाहतुकीची मोठया प्रमाणात होत असलेली कोंडी व होत असलेले अपघात, सबब वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१६) "राज्यातील आरोग्यविषयक समस्यांमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाढ, जिल्हा रुग्णालयांची निधी अभावी झालेली दुर्दशा, ही परिस्थिती सुधारण्यासाठी राज्यातील आरोग्य विषयक समस्यांचे युध्दपातळीवर निराकरण करण्याकरीता शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१७) "मुंबईमध्ये पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी मुंबईतील जलवाहिन्यांची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी व पाण्याचे नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. "

**श्री.संजय भेगडे यांचे ठराव क्रमांक २१८, २१९, २२०, २२१ व २२२**

(२१८) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१९) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२०) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२१) "राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हे शोधून काढण्यात व गुन्हेगारांना पकडण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधीमंडळातील दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२२) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्‌ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.भिमराव तापकीर यांचे ठराव क्रमांक २२३, २२४, २२५, २२६ व २२७

(२२३) "राज्याच्या ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२४) "राज्यात वाढत चाललेली सुशिक्षित बेरोजगारांची संख्या, सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुन सुमारे १० ते १५ वर्षाच्या कालावधीनंतरही नोकरी न मिळणे, राज्यात स्वयंरोजगार योजना सुरु होवून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध न होणे, परिणामी त्यांच्यात वाढत असलेली वैफल्याची भावना व तीव्र असंतोष लक्षात घेता सुशिक्षित बेरोजगारांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी तसेच नोकरी मिळण्यासाठी सेवायोजन कार्यालयातील कामकाज पध्दतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२५) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२६) "महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीने वीजेचे दर शेती पंपाकरिता आणि घरगुती वीज ग्राहकांकरिता भरमसाठ वाढवणे, त्याचबरोबर मोठ्यामोठ्या वातानुकूलित मॉल्सच्या वीज वापराच्या दरात वाढ न करणे, या वीज दरवाढीमुळे शेतीची अर्थव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होणे, म्हणून शेतीपंपासाठी आणि घरगुती वापरासाठी पुढील १० वर्षे वीज वापराचे दर एकाच निश्चित दरपत्रकाप्रमाणे ठरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२७) "राज्यातील अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकेल या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.गोपाळ शेट्टी यांचे ठराव क्रमांक २२८, २३०, २३१ व २३२

(२२८) "राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३०) "मानवतेचे महाभाष्यकार असलेल्या श्री. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या श्री. ज्ञानेश्वरीचे सप्तशताब्दी वर्षाचे औचित्य साधून त्यांचे उचित स्मारक व्हावे व त्यांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या "नेवासे" परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने एक कालबध्द योजना आखून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३१) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरणे, तलाव व भू-गर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३२) "देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरीता लढा देऊन त्यासाठी काळया पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना "मरणोत्तर भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.गिरीश बापट यांचे ठराव क्रमांक २३४ व २३६

(२३४) "पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्हयातील जनतेच्या सोयीसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ पुणे येथे स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३६) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुर्नबांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढतत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुर्नरचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.मंगलप्रभात लोढा यांचे ठराव क्रमांक २३९, २४०, २४१ व २४२

(२३९) "भारताचे शांघाय म्हणून मुंबईची ओळख जगाला व्हावी म्हणून प्रयत्नशील असणाऱ्या शासनाने मागील अनेक वर्षापासून मुंबई शहराच्या जमिनीचा सर्व्हे न करणे, मुंबई शहरात बांधकामाची झालेली व होत असलेली प्रचंड वाढ,तथापि, अशा प्रकारे झालेल्या बांधकामाची जिल्हाधिकारी कार्यालयात नोंद नसणे, त्यामुळे शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडणे,गरजू नागरिकांना मागणी करुनही नोंदी उपलब्ध नसल्यामुळे मालमत्ता प्रमाणपत्र प्राप्त न होणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता मुंबई शहराला नोंद नसलेल्या बांधकामांपासून वाचविण्यासाठी व शासनाच्या महसूलात वाढ होण्यासाठी मुंबई शहरातील जमिनीचे सर्वेक्षण करण्याकरिता खास अभियान तातडीने राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४०) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४१) "राज्यात अनेक कुटुंबांचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्रय रेषेखालील पिवळया शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,०००/- वार्षिक उत्पन्न दारिद्रयरेषेची मर्यादा १० वर्षापुर्वी ठरविली असणे, तसेच शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्रय रेषेची मर्यादा रुपये २५,०००/- ठरविली असणे, यामध्ये स्वतःच्या मालकीचे घर, कलर, टि.व्ही., गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल केल्या असणे, एकाच शासनाचे दारिद्रय रेषेसाठी असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून मिळणारे धान्य अपुरे असल्याने दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची मर्यादा रुपये १५,००० वरुन रुपये ५०,०००/- करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची शासनाने मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४२) "मुंबईची वाढती लोकसंख्या व त्यात परराज्यातून सतत येणाऱ्या लोंढयाची पडत असलेली भर, त्यामुळे विस्कळीत होणारे राज्याचे नियोजन, त्यातून निर्माण होणाऱ्या अनेकविध समस्या, वाढती बेरोजगारी, पिण्याचे अपुरे पाणी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर पडणारा अनावश्यक ताण, शिक्षणाची होत असलेली दुरावस्था, परिणामी राज्याची अर्थव्यवस्था विस्कळीत होणे, इत्यादी बाबींसाठी युध्दपातळीवर कार्यक्रम राबवावा व त्यासाठी विशेष

उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.जगन्नाथ शेट्टी यांचे ठराव क्रमांक २४८, २४९, २५०, २५१ व २५२

(२४८) "राज्यातील ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर इत्यादी शहरातील व विशेषतः मुंबई शहरातील राहत्या घरांच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या किंमती विचारात घेता सामान्य माणसाला वरील शहरांमध्ये सदनिका घेणे अशक्य झाले असल्याने यावर काही प्रमाणात नियंत्रण आणण्यासाठी शासनाने उक्त शहरातील सदनिकांचे भाव ठरविण्यासाठी एका तज्ञ समितीची स्थापना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४९) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५०) "राज्यात विशेषतः मुंबई शहरात गेले वर्षभरात दहशतवादी संघटनांनी विविध ठिकाणी केलेल्या बॉम्बस्फोटाच्या घटना, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली परिस्थिती ,वाढत्या गुन्हेगारी कारवायांमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता, या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम आखण्याकरिता विधीमंडळातील दोन्ही सदनांतील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५१) "राज्यात दूरदर्शनवर तसेच केबल नेटवर्कवर विविध चॅनलद्वारे अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे गंभीर दुष्परिणाम, वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील प्रसारणावर केंद्र शासनाने तात्काळ बंदी घालावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५२) "वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.बाळा नांदगांवकर यांचे ठराव क्रमांक २६१ व २६२

(२६१) "जीवनावश्यक वस्तूंचे कडालेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६२) "मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नबांधणीबाबतचे शासनाचे उदासीन धोरण तसेच मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व

मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.नितीन सरदेसाई यांचे ठराव क्रमांक २६३ व २६४

(२६३) "मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ या सुमारे ६०० कि.मी. लांबीच्या अंतरामध्ये असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे, असंख्य चढउतार, कालबाहय झालेले असंख्य अरुंद, कमकुवत व मोडकळीस आलेले पूल, अनेक ठिकाणी रस्त्यांच्या बाजूने संरक्षक भिंत, कठडे नसणे, साईनबोर्डस, साईडपट्टयांचा अभाव तसेच संपूर्ण महामार्गाची झालेली दुरावस्था, परिणामतः या महामार्गावर सातत्याने होत असलेले अपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली मनुष्यहानी, ट्रक, मोटारगाडया व अन्य वाहनांसह मालमत्तेचे झालेले व होत असलेले प्रचंड प्रमाणातील नुकसान, या सर्व बाबी विचारात घेता मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या महामार्गावर असलेली सर्व वेडीवाकडी वळणे, चढउतार तसेच अरुंद, कमकुवत, मोडकळीस आलेल्या व त्यामुळे कालबाहय झालेल्या पुलांच्या पुर्नबांधणी आदी कामाबाबत एक कालबध्द योजना आखून त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६४) "मराठी भाषेला 'अभिजात भाषा' हा दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.नितीन भोसले यांचे ठराव क्रमांक २७७, २७८, २७९ व २८१

(२७७) "राज्यातील खेळाडुंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडाक्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७८) "राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७९) "राज्यातील ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर इत्यादी शहरातील व विशेषतः मुंबई शहरातील राहत्या घरांच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या किंमती विचारात घेता सामान्य माणसाला वरील शहरांमध्ये सदनिका घेणे अशक्य झाले असल्याने यावर काही प्रमाणात नियंत्रण आणण्यासाठी शासनाने उक्त शहरातील सदनिकांचे भाव ठरविण्यासाठी एका तज्ञ समितीची स्थापना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८१) "राज्यात अल्पवयीन मुलींवर व स्त्रियांवर होणारे अत्याचार, त्यांना ठार मारणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे इत्यादी गुन्ह्यांचे वाढत असलेले प्रमाण, या गुन्ह्यांमध्ये अपराधी मोकळे सुटून त्यांचे मनोबल वाढणे, परिणामी स्त्रियांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची

भावना, अशा प्रवृत्तींना तातडीने आळा घालून गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यात प्रत्येक जिल्ह्यांच्या ठिकाणी महिलांवरील अत्याचाराबाबतचे खटले तातडीने निकालात काढण्यासाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## ॲड.उत्तमराव ढिकले यांचे ठराव क्रमांक २८२, २८३, २८४ व २८५

(२८२) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८३) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८४) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तूंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तूंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करुन जीवनावश्यक वस्तूंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८५) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## श्री.भाऊराव पाटील यांचे ठराव क्रमांक २८६, २८७, २८८, २८९ व २९०

(२८६) "राज्याच्या ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८७) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८८) "राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली

समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८९) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९०) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री.राजकुमार बडोले यांचे ठराव क्रमांक ३००, ३०१ व ३०२**

(३००) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भुमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०१) "पूर्व विदर्भातील विशेषतः भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी भावाने धानाची विक्री केली असल्यास त्यांना हमी भावावरची फरकाची रक्कम बोनस म्हणून देण्यात येणे, राज्याबाहेरील येणाऱ्या तांदुळावरती शासनाने टॅक्स आकारणे, हमी भावापेक्षा कमी दराने धान खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवरती (मिल मालक) फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे,अशी शिफारा ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०२) भंडारा, गोंदिया, चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना राज्यातील इतर भागातील शेतकऱ्यांना शेतमालाचे आर्थिक नुकसान झाल्यास ज्याप्रमाणे नैसर्गिक आपत्ती म्हणून नुकसान भरपाई देण्यात येते त्याच धर्तीवर धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील धानाचे पुंजणे आकस्मित जळाल्यावर कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान भरपाई देण्यात येत नसणे, धान उत्पादक शेतकऱ्यांना धानाचे पुंजणे जळाल्यावर नैसर्गिक आपत्ती म्हणून नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**एकवीस.** सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्ररित्या वितरित करण्यात येईल).

**विधान भवन,** **डॉ. अनंत कळसे,**

मुंबई,
दिनांक : ६ जुलै, २०१३.

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.